**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक : 02.06.2024** **रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. देशात निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात 62 पूर्णांक 36 टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक दिग्गजांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद.
2. 18 व्या लोकसभा निवडणुकीची मतमोजणी 4 जून रोजी; निवडणूक यंत्रणा सज्ज.
3. पावसाळी हंगामात नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासन सज्ज.
4. रामतीर्थ गोदा राष्ट्रजीवन पुरस्कार श्री राम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष श्री गोविंद देवगिरी महाराज यांना प्रदान.

आणि

5. ७१ वी राज्य अजिंक्यपद निवड कबड्डी स्पर्धा पुण्यात होणार.

**निवडणूक**

लोकसभेच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात 7 राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात पसरलेल्या ५७ लोकसभा मतदारसंघांसाठी का ल 62 पूर्णांक 36 टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यामध्ये उत्तर प्रदेश आणि पंजाबमधील प्रत्येकी 13, पश्चिम बंगाल 9, बिहार 8, ओडिशा 6, हिमाचल प्रदेश 4, झारखंड 3 आणि चंदीगडमधील एका मतदारसंघाचा समावेश आहे. या टप्प्यात एकंदर 904 उमेदवार रिंगणात होते. पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजप नेते नरेंद्र मोदी, पक्षाचे नेते अनुराग ठाकूर, रविशंकर प्रसाद आणि कंगना रणौत, काँग्रेस नेते मनीष तिवारी आणि विक्रमादित्य सिंग, आरजेडी नेत्या मीसा भारती आणि तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं आहे. गेल्या 43 दिवसांत, 543 पैकी 542 मतदारसंघातील मतदारांनी 18 व्या लोकसभेसाठी मतदान केले. सुरतमध्ये भाजपचा उमेदवार बिनविरोध निवडून आला.

**मतमोजणी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकी अंतर्गत राज्यात सर्वत्र, मतमोजणीसाठी, निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व चार लोकसभा मतदार संघांची मतमोजणी ४ जून रोजी होत असून सकाळी ८ वाजता टपाली मतदान आणि ईटी-पीबीएस मतांची मोजणी होणार आहे. ईव्हीएमच्या मतमोजणीची सुरूवात साडेआठ वाजता होणार असून मतमोजणी कक्षातील सर्व कामकाजाचं

सीसीटीव्हीद्वारे रेकॉर्डिंग केलं जाणार असून व्हिडीओ कॅमेराद्वारेही चित्रीकरण केलं जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली. मतमोजणी केंद्रामध्ये उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी तसंच मतमोजणी प्रतिनिधी यांना मोबाईल सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

**'निवाडा जनतेचा'**

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी प्रादेशिक वृत्त विभागाकडून 'निवाडा जनतेचा' हा विशेष कार्यक्रम सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजे दरम्यान प्रसारित केला जाणार आहे.

मुंबई उपनगरातल्या चारही लोकसभा मतदारसंघातील मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज झालं आहे.

दरम्यान धुळे लोकसभा मतदारसंघात मतमोजणीच्या दिवशी जिल्ह्यातील सर्व अबकारी मद्यविक्री दुकानं निकाल जाहीर होईपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले आहेत.

**बैठक**

मतमोजणीच्या अगोदर इंडि-आघाडीची भविष्यातील रणनीती ठरवण्यासाठी काल नवी दिल्लीत कॉँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी बैठक झाली. इंडि आघाडी 295 जागा जिंकेल असा विश्वास खरगे यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. सोनिया गांधी, राहुल गांधी, माजी खासदार शरद पवार, फारूक अब्दुल्ला, अखिलेश यादव, अरविन्द केजरीवाल, सीताराम येचुरी, तेजस्वी यादव आदि नेते यावेळी उपस्थित होते. तृणमूल कॉँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी या बैठकीला उपस्थित राहणार नसल्याचं त्यांनी यापूर्वीच जाहीर केलं होतं. दरम्यान कॉँग्रेसनं मतदानोत्तर चाचण्यांवरील चर्चेवर टाकलेला बहिष्कार मागे घेतला आहे. कॉँग्रेसच्या या निर्णयावर भाजपाने टीका केली होती.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**बाईट**

पाचगणी नगरपरिषदेचा आरोग्य विभाग तसंच घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला, देश पातळीवरील ISO 9001:2015 मानांकन, नुकतंच मिळालं आहे. असं मानांकन प्राप्त करणारी पाचगणी ही राज्यातील पहिलीच नगरपरिषद ठरली आहे. भारत पॉइंट इथल्या कचरा प्रक्रिया प्रकल्पात राबवलेल्या उत्कृष्ट कार्यप्रणालीमध्ये अनेकांचे हातभार लागले. यात सहभागी, स्वयंप्रभा फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रद्धा दर्यापूरकर यांनी आकाशवाणीशी संवाद साधला.

*पाचगणी नगर परिषदेने राबवलेले उपक्रम लोक पूरक असून त्याची कार्यप्रणाली विचारात घेऊन आयएसओ मानांकन मिळाले हे खूप मौल्यवान आहे. या मानांकनाचा दर्जा मिळवण्यासाठी अनेकांचे हातभार लागले आहे. स्वच्छ भारत पॉईंट' हे कचरा व्यवस्थापनाचे उत्कृष्ट एक उत्कृष्ट उदाहरण असून शहरातील कचऱ्याची प्रभावीपणे आणि पर्यावरण पूरक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी हे केंद्र*

*अहोरात्र कार्यरत आहे. ओल्या कचऱ्यापासून वीज आणि खत निर्मिती केली जाते. तर सुक्या कचऱ्याची वर्गीकरण आणि पुनर्वापर केला जातो. धोकादायक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष पद्धतीचा वापर केला जातो. आरोग्य आणि कचरा व्यवस्थापन याची सुयोग्य सांगड नगरपरिषदेने घातल्याने शहरातील नागरिकांच्या आरोग्य नक्कीच उंचावले आहे.*

**एसटी**

एसटी अर्थात राज्य परिवहन महामंडळाचा ७६ वा वर्धापनदिन सोहळा काल मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व बसस्थानकं स्वच्छ करून दर्शनी भागात आकर्षक रांगोळी काढण्यात आली, तसंच तोरणं बांधण्यात आली होती. एसटी बसची पुजा-अर्चाही करण्यात आली. ठिकठिकाणी एसटी बस गाड्या सजवण्यात आल्या. एक जून, १९४८ रोजी पुणे-अहमदनगर मार्गावर एसटीची पहिली बस धावली होती. भविष्यात देखील एसटी दर्जेदार सेवा देईल अशी ग्वाही मंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी यानिमित्तानं दिली.

**बैठक**

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेसने दुष्काळ संदर्भात नेमलेल्या विदर्भाच्या समितीची बैठक, काल पार पडली. विदर्भात ५ जूनपासून ही समिती पाहणी दौरा करणार आहे. त्यानंतर सविस्तर अहवाल राज्य सरकार पुढे मांडून शेतकऱ्यांसाठी भरीव आणि ठोस अशा मदतीची मागणी करणार आहे. खरीप हंगाम तोंडावर असताना बैठक होत नाही, खतांचा तुडवडा आहे, बियाणाचे दर वाढले आहेत अशी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली आहे.

**दरड प्रशासन**

पावसाळी हंगामात नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनानं कृती आराखडा तयार केला आहे. कोणतीही जीवितहानी न होण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून त्यासाठी ग्राम-स्तरापासून जिल्हा-स्तरापर्यंत विविध योजना आपत्ती व्यवस्थापनाकडून तयार करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील संभाव्य ६२ गावं दरड प्रवणग्रस्त, ३९ गावं पूरबाधित आणि ४१ गावं धरण प्रवणग्रस्त म्हणून निश्चित करण्यात आली आहेत.

**पुरस्कार-नाशिक**

नाशिक इथल्या रामतीर्थ गोदावरी सेवा समितीतर्फे पहिला रामतीर्थ गोदा राष्ट्रजीवन पुरस्कार श्री राम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष श्री गोविंद देवगिरी महाराज यांना काल नाशिकच्या पंचवटी इथे गोदाघाटावर प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि महादक्षिणा असं पुरस्काराचं स्वरूप आहे. विश्व मांगल्य सभेचे सभाचार्य आचंद्र आचार्य जितेंद्रनाथ महाराज, इस्कॉनच्या गोवर्धन

इको व्हिलेजचे संचालक गौरंग प्रभुजी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी श्री गोविंद गिरी महाराज यांनी कृतज्ञता व्यक्त केली. प्रभू रामचंद्रांनी  वास्तव्य केलेल्या पवित्र नाशिक नगरीत आणि गोदावरी तीरी पहिला रामतीर्थ पुरस्कार मिळाला हे मी माझं भाग्य समजतो, असं ते म्हणाले.

**कबड्डी स्पर्धा**

राज्य कबड्डी संघटना आणि पुणे जिल्हा कबड्डी संघटनेच्या सहकार्यानं ७१ वी राज्य अजिंक्यपद निवड कबड्डी स्पर्धा पुण्यात होणार आहे. वरिष्ठ पुरुष गटाची स्पर्धा १३ ते १६ जुलै तर आणि महिला गटाची स्पर्धा १७ जुलै ते २० जुलै या कालावधीत बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात होणार आहे. यामध्ये ३१ संघ सहभागी होणार असून, या स्पर्धा मॅटवर होणार असल्याची माहिती राज्य संघटनेचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांनी दिली.

**हवामान**

केरळमध्ये दाखल झाल्यानंतर नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी अरबी समुद्रात पोषक वातावरण तयार झालं असल्यामुळे येत्या आठवडाभरात मोसमी पाऊस पश्चिम महाराष्ट्रासह राज्याच्या विविध भागात  दाखल होईल असा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.